**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः16.12.2024** **वारःसोमवार**

---

महायुती सरकारच्या मंत्रिमंडळ विस्तारात एकंदर 39 मंत्र्यांनी घेतली शपथ

राज्य विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन आजपासून नागपूरमध्ये; सरकारनं आयोजित केलेल्या चहापानावर विरोधकांचा बहिष्कार

सरकार सर्व मुद्दयांवर चर्चेला तयार असल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

आणि

ब्रिस्बेन क्रिकेट कसोटीमध्ये ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या सर्व गडी बाद ४४५ धावा झाल्या

**<u>राज्यमंत्रीमंडळ</u>**

राज्य विधीमंडळाच्या आजपासून सुरू होत असलेल्या हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला काल महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यात आला. मंत्रिमंडळात समाविष्ट करण्यात आलेल्या ३९ आमदारांचा नागपूर इथल्या राजभवनात शपथविधी सोहळा काल पार पडला. यामध्ये भाजपला सर्वाधिक म्हणजे १६ कॅबिनेट तर ३ राज्यमंत्रीपदं मिळाली आहेत. महायुतीतल्या इतर घटक पक्षांपैकी शिवसेनेच्या वाट्याला ९ कॅबिनेट तर २ राज्यमंत्रीपदं आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला ८ कॅबिनेट तर १ राज्यमंत्रीपद आलं आहे. या शपथ घेणाऱ्या मंत्र्यांमध्ये भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राधाकृष्ण विखे - पाटील, चंद्रकांत पाटील, गिरीश महाजन, गणेश नाईक, या भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांचा समावेश आहे. अन्य मंत्र्यांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे, दत्ता भरणे यांचा तसंच शिवसेनेच्या गुलाबराव पाटील, दादा भुसे, उदय सामंत, संजय राठोड, संजय शिरसाट, भरत गोगावले आदींचा समावेश आहे. भाजपच्या पंकजा मुंडे, पुण्यातील पर्वती मतदारसंघाच्या आमदार माधुरी मिसाळ, मेघना बोर्डीकर तसंच राष्ट्रवादीच्या अदिती तटकरे या चार महिला मंत्र्यांनी काल शपथ घेतली. राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी या सर्वांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नीतीन गडकरी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अन्य मान्यवर या समारंभाला उपस्थित होते. नागपूरमध्ये ३३ वर्षांनंतर प्रथमच मंत्रीमंडळ विस्तार करण्यात आला.

**<u>अधिवेशन</u>**

राज्य विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन आजपासून नागपुरात सुरू होत आहे. या अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला काल सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी आणि त्याआधी विरोधी पक्षाच्या नेत्यांनी, पत्रकार परिषद घेऊन आपापली भूमिका स्पष्ट केली. अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी बोलावलेल्या चहापानावर विरोधी पक्षानं बहिष्कार घातला.

**Intro**

सत्ताधारी

नागपूरमध्ये होत असलेल्या या हिवाळी अधिवेशनात सर्व मुद्दयावर चर्चेसाठी आम्ही तयार आहोत, विरोधकांनी सभागृहात चर्चा करावी असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. नव्या मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी बोलताना ते म्हणाले ..

मिशन समृद्ध महाराष्ट्र हा आमचा ध्यास आहे, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. निवडणुकीमध्ये महायुतीला घवघवीत यश मिळालं असून जनतेनं विरोधकांना त्यांची जागा दाखवून दिली आहे, मात्र तरीही सुदृढ लोकशाहीसाठी आम्ही विरोधकांच्या मताचा आदर करू, असं शिंदे म्हणाले.

दोन ते तीन दिवसात मंत्रिमंडळाचं खातेवाटप होईल अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिली.

**विरोधक**

तत्पूर्वी विधान परिषदेतले विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, काँग्रेसचे नाना पटोले, विजय वडेट्टीवार, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जितेंद्र आव्हाड आदी नेत्यांनी पत्रकार परिषद घेतली. महायुती सरकारमधल्या घटक पक्षांनी निवडणुकीच्या काळामध्ये ,शेतकरी आणि महिलांना दिलेली आश्वासनं तातडीनं पूर्ण करावीत, अधिवेशनाचा कालावधी वाढवावा, आणि परंपरा लक्षात घेता आघाडीच्या नेत्याला विरोधी पक्ष नेतेपद द्यावं, अशा मागण्या या नेत्यांनी केल्या. परभणीची घटना आणि बीडमध्ये सरपंचाची झालेली हत्या गृह खात्याच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे, अशी टीका या नेत्यांनी केली. या सगळ्या प्रकाराची उच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायाधिशांमार्फत तसंच सीबीआय मार्फत चौकशी करावी, अशी मागणी नाना पटोले यांनी यावेळी केली.

**अधिवेशनतयारी**

नागपुरात आजपासून सुरू होत असलेल्या हिवाळी अधिवेशनाच्या अनुषंगानं विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी काल तयारीचा आढावा घेतला. अधिवेशन कालावधीत कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना त्यांनी यंत्रणांना केल्या.

**पुस्तक महोत्सव**

पुणे पुस्तक महोत्सवाच्या अनुषंगानं अनेक विक्रमांची नोंद होत असून, आज ९० हजारांपेक्षा अधिक पुस्तकांच्या सहाय्यानं संविधानाचं शिल्प साकारण्यात येणार आहे. यावेळी नागरिकांना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा इतिहास आणि त्यांच्याशी निगडित, दुर्मिळ वस्तू पाहण्याची संधी मिळेल अशी माहिती महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे यांनी दिली आहे. दरम्यान, पुणे पुस्तक महोत्सवामध्ये काल सुटीच्या दिवशी हजारो पुणेकरांनी गर्दी केली होती. पुस्तक खरेदीबरोबरच आकर्षक सजावट, कलाकृती, शिल्प, चित्र, आणि खाद्यपदार्थांचाही पुणेकरांनी मनमुराद आनंद लुटला.

**<u>संगीतनाटक</u>**

संगीत नाटक म्हणजे मराठी नाट्यसृष्टीचा सुवर्णकाळ; या संगीत नाटकांना पुन्हा एकदा वैभवाचा काळ प्राप्त व्हावा या भूमिकेतून पुण्यातील बालगंधर्व संगीत रसिक मंडळानं 'संगीत स्वयंवर' या नाटकाचा भव्य दिव्य वैभवी थाटातील प्रयोग काल पुण्यात आयोजित केला होता. ऐकुया या सोहळ्याचा वृत्तांत...

स्क्रिप्ट

भरजरी शालू अन् शेला परिधान केलेली, अस्सल सोन्याच्या दागिन्यांनी मढलेली रूख्मिणी, संगीत नाटकांच्या सुवर्णकाळाची साक्ष देणारी लोकप्रिय नाट्यपदं, परदेशातून मागवलेल्या उंची अत्तराचा दरवळ, रसिक प्रेक्षकांचं स्वागत करणारी सोनचाफ्याची फुलं, असा वैभवी थाट काल पुणेकर रसिकांना थेट बालगंधर्व युगात घेऊन गेला. निमित्त होतं मराठी संगीत नाटकांना पुन्हा एकदा वैभवाचा काळ प्राप्त व्हावा, या भूमिकेतून बालगंधर्व संगीत रसिक मंडळानं आयोजित केलेल्या 'संगीत स्वयंवर' या नाटकाच्या वैभवी थाटातील प्रयोगाचं. यावेळी बालगंधर्वांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. बालगंधर्वांची नात ज्योत्सना बडवे तसंच अनुराधा राजहंस आणि श्रीपाद राजहंस या बालगंधर्वांच्या वंशजांचा विशेष सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या प्रयोगासाठी रूख्मिणीची भूमिका प्रसिद्ध गायिका अभिनेत्री अस्मिता चिंचाळकर यांनी साकारली. या रूख्मिणीचे अस्सल सोन्याचे दागिने, भरजरी शालू या बरोबरच ही भूमिका साकारताना नटसम्राट बालगंधर्व जो शेला वापरत असत तो पुन्हा एकदा पाहण्याची संधी यानिमित्ताने प्रेक्षकांना मिळाली. चिन्मय जोगळेकर, वर्षा जोगळेकर, सुदिप सबनीस, अवंती बायस, संजय गोसावी, विजय कुलकर्णी, निरंजन कुलकर्णी यांनीही यामध्ये विविध भूमिका साकारल्या. त्यांना ऑर्गनवर संजय गोगटे आणि तबल्यावर विद्यानंद देशपांडे यांनी साथसंगत केली. या नाट्यप्रयोगाला पुणेकर रसिक प्रेक्षकांनीही भरजरी साड्या, झब्बे कुडते आणि पुणेरी पगडी अशा पारंपारिक वेशभूषेत उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आकाशवाणी बातम्यांसाठी नितीन जळूकर यांच्यासह मंजिरी गानू पुणे.

**<u>सोयाबीन खरेदी</u>**

राज्य सरकारनं हमीभावानं सोयाबीन खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यात १४ डिसेंबरपर्यंत ५५१ खरेदी केंद्रांवर केवळ १ लाख ३१ हजार टन सोयाबीनची खरेदी झाली आहे. शेतकऱ्यांना नोंदणीसाठी १५ डिसेंबरवरून ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्य सरकारनं ४,८९२ रुपये प्रतिक्विंटल हमीभावानं सोयाबीन खरेदी करण्याचे निर्देश नाफेड आणि नॅशनल को-ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन ऑफ इंडिया लि. या दोन संस्थांना दिले आहेत. ही खरेदी ६७ हजार ७५३ शेतकऱ्यांकडून

करण्यात आली आहे. राज्यात यासाठी ५८१ केंद्रांना खरेदीची परवानगी देण्यात आली आहे. त्यातील ५५१ केंद्रं सुरू असल्याची माहिती सहकार आणि पणन विभागानं दिली.

**लोकअदालती**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या निर्देशावरून काल बीड इथं पार पडलेल्या लोक न्यायालयात, बीड जिल्हयातली एकंदर २ हजार ३९३ प्रकरणं तडजोडीनं निकाली काढण्यात आली. संपूर्ण बीड जिल्हयातून ११ हजार ०४२ प्रलंबित प्रकरणं लोकअदालतीत ठेवण्यात आली होती.

सोलापूर इथं झालेल्या लोकअदालतीत जिल्हयातील एकूण १९ हजार ८३१ प्रकरणे सामंजस्यानं निकाली काढण्यात आली. लोकअदालतीच्या माध्यमातून ७१ कोटी ५ लाख १४हजार ६०५ रुपये मूल्याच्या प्रकरणांमध्ये सांमजस्यानं तडजोड करण्यात आली.

**सिकलसेल**

पालघर जिल्ह्यात ११डिसेंबर पासून १७ डिसेंबरपर्यंत सिकलसेल जनजागृती सप्ताह राबवण्यात येत आहे. जिल्ह्यात 2009 पासून जवळपास १४ लाख व्यक्तींच्या सिकलसेलच्या तपासण्या करणात आल्या आहेत. त्यात 24 हजार 228 वाहक आणि 1 हजार 606 सिकलसेल बाधित रुग्ण आढळून आले आहेत. त्यामुळे या रुग्णांना मोफत औषधोपचार, रक्त पुरवठा, समुपदेशन करण्यात येत आहे. दरम्यान या रुग्णांना संजय गांधी निराधार योजनेंतर्गत आर्थिक लाभ सुद्धा देण्यात येत असल्याची माहिती जिल्हा आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे.

**नक्षलवाद**

गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी पोलिसांचा घातपात करण्याच्या हेतूने जंगलात पुरुन ठेवलेली स्फोटकं शोधून काढण्यात पोलिसांना यश आलं. अहेरी तालुक्यातील मरपल्ली पोलिस मदत केंद्रांतर्गत, करंचा गावानजीकच्या जंगलातून ही स्फोटकं शिताफीने बाहेर काढून ती नष्ट करण्यात आली. जिमलगट्टाचे उपविभागीय पोलिस अधिकारी शशिकांत दसूरकर यांच्या नेतृत्वात मरपल्ली पोलिस मदत केंद्रातील पोलिस आणि राज्य राखीव दलाच्या जवानांनी ही शोध मोहीम राबवली.

**क्रिकेट**

ब्रिस्बेन इथं सुरू असलेल्या बॉर्डर- गावसकर करंडक क्रिकेट कसोटी मालिकेतल्या, भारताविरुद्धच्या तिसऱ्या आजच्या तिसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलियाची पहिल्या डावात सर्व गडी बाद ४४५ धावा झाल्या आहेत. स्टीव्हन स्मिथ आणि ट्रॅव्हिस हेड या ऑस्ट्रेलियन फलंदाजांनी, शतकं झळवत केलेली २४१ धावांची भागीदारी हे कालच्या दिवसाचं वैशिष्ट्य ठरलं. ट्रॅव्हिस हेड नं या मालिकेत सलग

दुसऱ्यांदा शतक केलं आहे. जसप्रीत बुमराहनं यजमान संघांचे सहा गडी बाद केले. पाच सामन्यांच्या या मालिकेत सध्या दोन्ही संघांनी प्रत्येकी एक सामना जिंकला आहे.

**<u>हवामान</u>**

राज्याच्या अनेक भागांमध्ये थंडीची लाट आहे. पारा दहा अंशांच्या खाली घसरला आहे. आजही ही लाट कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.